दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सई परांजपे यांना 'विष्णुदास भावे गौरव पदक' पुरस्कार जाहीर

सांगली : नाट्यशास्त्र आणि रंगभूमीच्या क्षेत्रात बहुमूल्य योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नाटककार, लेखिका व दिग्दर्शिका सई परांजपे (Sai Paranjpe) यांना यंदाचा प्रतिष्ठित 'विष्णुदास भावे गौरव पदक' पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या ५ नोव्हेंबर रोजी 'रंगभूमी दिना'चे औचित्य साधून अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीतर्फे सांगली येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. नाट्य संमेलनाचे अध्यक्ष मोहन जोशी यांच्या शुभहस्ते हा सन्मान प्रदान केला जाईल.

वरिष्ठांच्या शिष्टाईनंतरही अनेक मतदारसंघांत बंडखोरी कायम

मुंबई : विधान परिषदेच्या पाच जागांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत शुक्रवारी संपल्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असले, तरी महायुती आणि महाविकास आघाडीतील बंडखोरी पूर्णपणे शमलेली नाही. पुण्यात वरिष्ठ नेत्यांच्या मध्यस्थीनंतर महायुतीतील मंगेश चिवटे आणि भैय्या माने यांनी माघार घेतली; मात्र पुणे शिक्षक, पुणे पदवीधर, नागपूर पदवीधर, अमरावती शिक्षक आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघांत काही उमेदवारांनी माघार न घेतल्याने अधिकृत उमेदवारांसमोर आव्हान कायम आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १६९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

2026 फॉर्च्युनर लीडर एडिशन सादर

बंगळुरू : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आपल्या सर्वात प्रतिष्ठित एसयूव्ही पैकी एक असलेल्या फॉर्च्युनरचे नवीन लीडर एडिशन सादर करण्याची घोषणा केली. या नव्या आवृत्तीत केबिनमधील अनुभव अधिक परिष्कृत करण्यात आला आहे. आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षेने नेतृत्व करणाऱ्या ग्राहकांसाठी तयार करण्यात आलेले हे नवीन एडिशन फॉर्च्युनरचे प्रीमियम आकर्षण अधिक वाढवते. त्याचबरोबर, फॉर्च्युनरला दीर्घकाळापासून यशस्वी बनवणारी मूलभूत वैशिष्ट्ये कायम ठेवण्यात आली आहेत. 2026 फॉर्च्युनर लीडर एडिशनमध्ये तिचे दमदार आणि आकर्षक व्यक्तिमत्त्व अधिक उठावदार करण्यासाठी अनेक विशेष सुधारणा करण्यात आल्या आहेत.बाह्य डिझाइनमधील वैशिष्ट्यांमध्ये खास डिझाइन केलेली फ्रंट ग्रिल, काळ्या रंगातील मागील दरवाजाची गार्निश, मॅचिंग हब कॅप्ससह ग्लॉस ब्लॅक अलॉय व्हील्स, काळ्या रंगातील रूफ ट्रीटमेंट आणि काळ्या रंगातील अँटेना यांचा समावेश आहे.

एचवायबीई कडून वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडियाची घोषणा

पुणे – : एचवायबीई आपला प्रमुख जागतिक संगीत महोत्सव वीवर्स कॉन फेस्टिव्हल प्रथमच भारतात घेऊन येत आहे. 27–28 मार्च 2027 रोजी नवी दिल्ली येथे हा महोत्सव आयोजित करण्यात येणार असून, कोरियाबाहेर प्रथमच या महोत्सवाचे आयोजन भारतात होणार आहे.दोन दिवस चालणारा वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडिया एचवायबीई चा खास थेट संगीताचा अनुभव भारतात घेऊन येणार आहे. या महोत्सवात भारतातील तसेच जगभरातील नामांकित कलाकार, नेत्रदीपक संगीत सादरीकरणे आणि चाहत्यांच्या संस्कृतीचा उत्साहपूर्ण जल्लोष एकाच मंचावर पाहायला मिळणार आहे. भारतीय चाहत्यांसाठी हा महोत्सव एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण ठरणार असून, भारतीय चाहत्यांसाठी, हा महोत्सव देशातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या के-पॉप महोत्सवांपैकी एक असेल.

विवोने भारतात एक्स फोल्ड 6 लाँच केला

नवी दिल्ली : विवो इंडियाने आज आपला नवीनतम फोल्डेबल स्मार्टफोन, विवो एक्स फोल्ड६ लाँच केला, जो फ्लॅगशिप स्मार्टफोनच्या अनुभवाला मल्टीटास्किंगसाठी तयार केलेल्या एका शक्तिशाली उत्पादकता वर्कस्पेसमध्ये रूपांतरित करतो. ओरिजिनओएस ७, प्रगत एआय टूल्स, फ्लॅगशिप झाईस इमेजिंग आणि ६९००mAh क्षमतेची मोठी बॅटरी यांसारख्या वैशिष्ट्यांसह, एक्स फोल्ड६ अशा व्यावसायिकांसाठी फ्लॅगशिप फोटोग्राफी आणि एक शक्तिशाली उत्पादकता अनुभव घेऊन येतो, ज्यांना प्रवासात असताना काम करायचे आहे, नवनिर्मिती करायची आहे आणि कनेक्टेड राहायचे आहे.

मुदतठेवींवरील व्याजदरात 40 बेसिस पॉईंटपर्यंत वाढ

मुंबई : भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील नॉन-बँकिंग वित्तीय कंपनी बजाज फायनान्स लिमिटेडने आज त्यांच्या मुदतठेवींवरील व्याजदरांमध्ये १२ ते ६० महिन्यांच्या सर्व मुदतींसाठी १५ ते ४० बेसिस पॉईंट्सची वाढ केली आहे. सुधारित दर आजपासून लागू झाले असून ते नवीन ठेवी आणि नूतनीकरण या दोन्हीसाठी लागू आहेत. दीर्घ मुदतीवर सर्वात मोठी वाढ करण्यात आली आहे. ३१ ते ६० महिन्यांच्या कालावधीसाठीचे दर नियमित ठेवीदारांसाठी ३५ बेसिस पॉईंट्स आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ४० बेसिस पॉईंट्सने वाढले आहेत.नवीन ठेवी बुक करणारे नियमित ठेवीदार आता ३१ ते ६० महिन्यांसाठी एकत्रित वार्षिक ७.७५ टक्के पर्यंत व्याज मिळवू शकतात, जे पूर्वी वार्षिक ७.४० टक्के होते. १२ ते १७ महिन्यांच्या मुदतीचे दर वार्षिक ६.६० टक्के वरून वाढून ६.८० टक्के झाले आहेत आणि १८ ते ३० महिन्यांच्या मुदतीचे दर वार्षिक ६.८५ टक्क्यांवरून ७.०० टक्के झाले आहेत



पनवेल मध्ये खरगे, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या अटकेच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन

जिल्हाध्यक्ष डॉ. श्रुती म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन; निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता आणि लोकशाहीच्या गळचेपीविरोधात काँग्रेस आक्रमक

उरण दि ९(विठ्ठल ममताबादे)

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांना पोलिसांनी केलेल्या अटकेच्या निषेधार्थ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने देशभरात ९ ऑक्टोबर हा दिवस 'भारतीय लोकशाहीसाठी काळा दिवस' म्हणून पाळण्यात आला. या आंदोलनाचे तीव्र पडसाद पनवेलमध्येही उमटले. पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. श्रुती श्याम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तीव्र आंदोलन करण्यात आले.

आंदोलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आणि अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाच्या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आंदोलन अहिंसेच्या मार्गाने करण्यात आले. सुरुवातीला कार्यकर्त्यांनी सुमारे एक तास शांततेत बसून केंद्रातील भाजप सरकारच्या धोरणांचा आणि लोकशाहीविरोधी कारवायांचा निषेध व्यक्त केला.

यानंतर जिल्हाध्यक्ष डॉ. श्रुती श्याम म्हात्रे यांनी आपल्या आक्रमक शैलीत उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित केले. त्या म्हणाल्या की, लोकशाहीची गळचेपी आणि नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारावर गदा आणण्याचे प्रयत्न सुरू राहिल्यास काँग्रेसचे आंदोलन थांबणार नाही. हे आंदोलन केवळ एका दिवसापुरते मर्यादित नसून लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी सुरू झालेली दीर्घकालीन प्रक्रिया आहे. जोपर्यंत देशात लोकशाहीची गळचेपी



होईल, तोपर्यंत काँग्रेसचा संघर्ष अविरत सुरू राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

आपल्या भाषणात काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉ.श्रुती म्हात्रे यांनी विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित केले. मतदार यादीतील अनियमितता, मतचोरीचे आरोप आणि पनवेलमधील मतदारांच्या अधिकारांबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि निवडणूक आयोगाची उत्तरदायित्वाची भूमिका याबाबत केंद्र सरकारने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

काँग्रेस नेत्यांना आंदोलनादरम्यान अडवून अटक करण्यात आल्याची घटना ही लोकशाही मूल्यांवर घाला असल्याची भूमिका आंदोलकांनी मांडली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवरही काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले. यावेळी कार्यकर्त्यांनी आक्रमक होत मुख्य निवडणूक आयुक्तांच्या पुतळ्याचे दहन करून निषेध नोंदवला. या आंदोलनात नगरसेवक हरिश केणी यांनीही उपस्थितांना संबोधित केले. खारघर परिसरात भाजप कार्यकर्त्यांकडे एसआयआर तपासणीसंबंधीचे फॉर्म आढळल्याच्या मुद्द्यावर त्यांनी भाजप सरकारवर टीका केली. तसेच पनवेलमधील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्यांकडे लक्ष वेधले. पनवेल महानगरपालिकेतील कथित भ्रष्टाचारावरही त्यांनी जोरदार टीका करत प्रशासनाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले.

माजी नगरसेविका शशिकला सिंग यांनी भाजप सरकारवर टीका करत देशातील महिलांवरील वाढत्या अत्याचारांचा मुद्दा उपस्थित केला. एसआयआर प्रक्रियेत जाणूनबुजून विशिष्ट समाजघटकाला लक्ष्य केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मतदार यादीच्या पुनरीक्षणाची प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष असणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

मतदानाचा अधिकार हिरावण्याचा प्रयत्न सहन करणार नाही : नगरसेवक लतीफ शेख

नगरसेवक लतीफ शेख यांनी संविधानाची शपथ घेऊन सत्तेवर आलेल्या भाजप सरकारवर समाजात जात आणि धर्माच्या आधारे तेढ निर्माण केल्याचा आरोप केला. एसआयआर प्रक्रियेच्या माध्यमातून नागरिकांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जाण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. लोकशाहीत प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळणे आवश्यक असून या अधिकाराच्या संरक्षणासाठी काँग्रेसचा लढा सुरूच राहील, असे ते म्हणाले.

आधार नोंदणीला खीळ; 19 हजार विद्यार्थ्यांचे अर्ज रखडले

जिल्हा परिषदेचे 51 पैकी 23 संच बंद; स्थायी समितीच्या बैठकीत बोगस आधार कार्डचाही मुद्दा उपस्थित





हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जिल्हा परिषदेकडून विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणीसाठी उपलब्ध करून दिलेल्या संचांपैकी जवळपास निम्मे संच बंद असल्याने विद्यार्थ्यांना आधार कार्ड मिळण्यात अडचणी येत आहेत. जिल्ह्यातील ५१ संचांपैकी २३ संच बंद असून, सध्या केवळ २८ संचांवर नोंदणी सुरू आहे. त्यामुळे सुमारे १९ हजार विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अर्ज प्रलंबित आहेत. या परिस्थितीवरून शुक्रवारी झालेल्या जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या बैठकीत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. बैठकीच्या सुरुवातीलाच दिवंगत अभिनेते नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सदस्य संजय निकम यांनी आधार नोंदणीतील अडचणी, बंद संच आणि बोगस आधार कार्डांचा मुद्दा उपस्थित केला.

जिल्हा परिषदेमार्फत आधार नोंदणीसाठी १७ केंद्रे चालविली जातात. या केंद्रांसाठी ५१ संच उपलब्ध करून देण्यात आले होते. मात्र, तांत्रिक अडचणी आणि ऑपरेटर ब्लॅकलिस्ट झाल्यामुळे २३ संच बंद पडले आहेत. ही माहिती महिला व बालकल्याण विभागाच्या जिल्हा कार्यक्रमाधिकारी डॉ. मंगला पांचाळ यांनी बैठकीत दिली.

संच बंद असल्याने विद्यार्थ्यांच्या नोंदणीवर परिणाम झाला आहे. शिऊर आणि खंडाळा परिसरातील विद्यार्थ्यांच्या अडचणींसह जिल्ह्यातील प्रलंबित अर्जांचा प्रश्नही बैठकीत चर्चेला आला. कागदपत्रे अपूर्ण असल्यामुळे नाकारले जाणारे अर्ज, त्यांची पूर्तता आणि नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून कोणती पावले उचलली जात आहेत, याबाबत सदस्यांनी माहिती मागितली.

सरकारी यंत्रणा उपलब्ध असतानाही आधार नोंदणीचे काम रखडत असल्याने बंद संच तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच आधार नोंदणी प्रक्रियेतील अनियमितता आणि बोगस आधार कार्डांच्या मुद्द्याचीही तपासणी करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी शिक्षण आणि आरोग्य विभागाने समन्वयाने काम करावे, तसेच बंद संच पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी दिले.

बैठकीला बांधकाम समिती सभापती सचिन गरड, बालाजी सोनटक्के, अनिता मोठे, शिवसेना गटनेते राधाकिसन पठाडे, सदस्य रतन बत्तीसे, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे उपस्थित होते.

वडगाव-कोल्हाटी, बजाजनगरातील विकासकामांसाठी जागा द्या; अन्यथा आंदोलन

एमआयडीसीला सभापती सचिन गरड यांचा एक महिन्याचा अल्टिमेटम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : वडगाव-कोल्हाटी आणि बजाजनगर परिसरातील मंजूर नागरी सुविधांची कामे जागेअभावी रखडली आहेत. सार्वजनिक स्वच्छतागृहे, उद्याने, शाळा, आरोग्य केंद्र आणि नाना-नानी पार्कसारख्या सुविधांसाठी सिडको व एमआयडीसी प्रशासनाने एका महिन्याच्या आत जागा उपलब्ध करून द्यावी; अन्यथा दोन्ही प्रशासनांविरोधात जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीचे सभापती सचिन गरड यांनी दिला.

जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या बैठकीत गरड यांनी वडगाव-कोल्हाटी आणि बजाजनगर परिसरातील नागरी सुविधांचा प्रश्न उपस्थित केला. स्वच्छ भारत मिशनअंतर्गत मंजूर सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या उभारणीसाठी आवश्यक जागा उपलब्ध होत नसल्याने कामे रखडल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

या परिसरात नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित अनेक विकासकामे प्रस्तावित असून, काही कामांना मंजुरीही मिळाली आहे. मात्र, सिडको आणि एमआयडीसी प्रशासनाकडून जागा उपलब्ध करून दिली जात नसल्याने या कामांच्या अंमलबजावणीत अडथळे येत आहेत. परिणामी, वाढत्या नागरी वस्तीला आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना प्रतीक्षा करावी लागत आहे. "सार्वजनिक शौचालये, उद्याने, शाळा, आरोग्य केंद्र आणि नाना-नानी पार्क यांसारखी कामे केवळ जागेअभावी रखडणे गंभीर आहे. सिडको, एमआयडीसी आणि जिल्हा परिषद प्रशासनाने समन्वय साधून तातडीने जागा उपलब्ध करून द्यावी. एका महिन्यात कार्यवाही न झाल्यास नागरिकांच्या प्रश्नांसाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशारा गरड यांनी दिला. दरम्यान, जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामेही रखडल्याचा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला. संबंधित विभाग, कंत्राटदार, ग्रामपंचायत आणि प्रशासकीय यंत्रणांनी समन्वय साधून या कामांना गती द्यावी व ती वेळेत पूर्ण करावीत, अशी मागणीही गरड यांनी केली.

पिंपळदरी पोलिसांनी 15.75 लाख रुपयांच्या गांजाची झाडे केली जप्त



हिंदू प्रकाश वार्ता

परभणी**दुष्काळाचे सदस्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे परभणी जिल्ह्यात अनेक ठिकाणी चोरून लपून गांजाच्या झाडाची लागवड करण्यात आली कितीही झाकून गांजाची शेती केली तरी त्याचा सुगंध दरवळत असल्यामुळे या गोष्टीची कोण कोण पोलिसांपर्यंत पोहोचतच असते अशाच प्रकार पिंपळदरी पोलीस ठाणे हद्दीत वागदरी शेत शिवारात गांजाची लागवड करणाऱ्या वर पोलीस प्रशासनाने कारवाई केली आहे सदरील कार्यवाहीत 31 किलो 500 ग्रॅम वजनाची 82 झाडे जप्त करण्यात आली असून त्यांचे अंदाजित किंमत 15 लाख 75 हजार रुपये एवढी आहे सदरील कार्यवाही दिनांक 8 ऑक्टोबर गुरुवार रोजी सायंकाळी च्या सुमारास करण्यात आली. अधिक माहिती अशी की वागदरीशी येथील शेत गट क्रमांक 52 मध्ये शासनाने प्रतिबंधित केलेल्या गांजा सदृश्य अमली पदार्थाची लागवड करून जोपासना करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली .

गाढेजळगावात कपाशीच्या शेतात गांजाची लागवड; 18.19 लाखांचा गांजा जप्त

करमाड पोलिसांची कारवाई; 430 झाडांतून 72.78 किलो गांजा जप्त, शेतमालकाला अटक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : करमाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गाढेजळगाव शिवारात कपाशीच्या पिकामध्ये बेकायदेशीररीत्या गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. करमाड पोलिसांनी शुक्रवारी (दि. ९) कारवाई करत ४३० लहान-मोठी गांजाची झाडे जप्त केली. या गांजाचे एकूण वजन ७२.७८ किलो असून, त्याची किंमत १८ लाख १९ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी शेतमालक श्रीराम रघुनाथ कोरडे (वय ५०, रा. गाढेजळगाव) याला अटक करण्यात आली आहे.

गाढेजळगाव शिवारातील शेतात गांजाची बेकायदेशीर लागवड केली जात असल्याची गोपनीय माहिती करमाडचे प्रभारी पोलीस निरीक्षक सम्राटसिंग व्ही. राजपूत यांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन आवश्यक परवानगी घेण्यात आली. त्यानंतर पोलीस, महसूल विभाग आणि न्यायवैद्यक विज्ञान पथकाच्या संयुक्त सहभागातून नियोजनबद्ध कारवाई करण्यात आली.

शुक्रवारी गाढेजळगाव शिवारातील गट क्रमांक ३३३ मधील श्रीराम कोरडे यांच्या मालकीच्या शेतात पंचांसमक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी कपाशीच्या पिकामध्ये गांजाची लागवड केल्याचे आढळून आले. पोलिसांनी शेतातील ४३० गांजाची झाडे जप्त केली. या प्रकरणी करमाड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४८१/२०२६ नुसार अमली पदार्थ आणि मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ मधील कलम ८(क), २०(ब)(१) आणि २०(ब)(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी पूंजा एस. नांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक सम्राटसिंग व्ही. राजपूत यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक गोकुळ एल. ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक गणेश पी. वाघ, पोलीस हवालदार जयसिंग नागलोत, शिवाजी मदेवाड, सोपान डकले, संतोष चव्हाण, पोलीस कर्मचारी श्रीकांत तळेगावे, शकुल बनकर, महादेव धोत्रे आणि अमोल मारकवाड यांनी सहभाग घेतला. महसूल विभागाचे ग्राम महसूल अधिकारी कृष्णा कारभारी घुगे तसेच न्यायवैद्यक विज्ञान पथकातील प्रतीक दरेकर यांनीही कारवाईत सहभाग घेतला.

पदवीधर निवडणुकीत 41 उमेदवारांचे आव्हान! 13 जणांची माघार; 3 लाख 26 हजार मतदार बजावणार मतदानाचा हक्क

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील उमेदवारी माघारीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात ४१ उमेदवार उरले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी १२ जणांनी माघार घेतली, तर यापूर्वी एका उमेदवाराने अर्ज मागे घेतला होता. त्यामुळे एकूण १३ उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या निवडणुकीसाठी २९ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबरदरम्यान ६२ उमेदवारांनी ९२ नामनिर्देशनपत्रे दाखल केली होती. ७ ऑक्टोबरला झालेल्या छाननीत आठ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरल्याने ५४ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यानंतर ८ ऑक्टोबरला



एका आणि ९ ऑक्टोबरला १२ उमेदवारांनी माघार घेतली. परिणामी, आता ४१ उमेदवारांमध्ये निवडणूक होणार आहे.

या निवडणुकीत एकूण ३ लाख २६ हजार ७०१ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये ७७ हजार ७१७ महिला, २ लाख ४८ हजार ९७१ पुरुष आणि १३ इतर मतदारांचा समावेश आहे. मतदानासाठी एकूण ८४२ केंद्रे निश्चित करण्यात आली असून, ९३५ केंद्राध्यक्ष आणि २ हजार ८१४ मतदान अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

येत्या २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. २७ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगरमधील चिकलठाणा एमआयडीसी येथील वुडस्टर्म डेकार येथे मतमोजणी होईल. मतमोजणीसाठी ४ हजार ४५५ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माधवी खोडे-चावरे यांची निरीक्षक, तर रामेश्वर रोडगे यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेला सहआयुक्त मंजुषा मिसकर उपस्थित होत्या. या निवडणुकीत मतपत्रिकेद्वारे पसंतीक्रमानुसार मतदान होणार आहे. निवडणुकीसंदर्भातील माहितीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

लोकशाहीचा पाया आणि जागरूक मतदाराचे कर्तव्य

लोकशाही व्यवस्थेत 'मतदानाचा हक्क' हा केवळ राजकीय हक्क नसून, सशक्त राष्ट्रउभारणीतील प्रत्येक नागरिकाचे सर्वात महत्त्वाचे कर्तव्य आहे. राज्यभरात सध्या सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती करणे किंवा नाव वगळण्यासाठी अर्ज दाखल करण्याची १२ ऑक्टोबर २०२६ ही अंतिम मुदत अत्यंत कळीची ठरली आहे. नवमतदारांसह ज्या पात्र नागरिकांचे नाव अजूनही मतदार यादीत आलेले नाही, त्यांना ही सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यासाठी १० आणि ११ ऑक्टोबर रोजी राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर आयोजित केलेली विशेष शिबिरे ही निवडणूक प्रशासनाची स्वागतार्ह आणि कौतुकास्पद धडपड आहे. या संधीचा पुरेपूर लाभ घेऊन प्रत्येक नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत निश्चित करणे हेच सुजाण नागरिकत्वाचे लक्षण ठरेल. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत नवीन नाव नोंदणीसाठी (नमुना-६) ७ लाखांहून अधिक आणि दुरुस्तीसाठी (नमुना-८) सुमारे ४ लाख अशा जवळपास ११ लाख नागरिकांनी अर्ज दाखल केले आहेत. हा प्रचंड प्रतिसाद राज्यातील जनतेची लोकशाही प्रक्रियेतील वाढती आस्था दर्शवतो. १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकास वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवमतदारांचा यात असलेला मोठा सहभाग देशाच्या राजकीय आणि सामाजिक भविष्यासाठी अत्यंत आशादायक आहे. मात्र, आजही अनेक नागरी भागात उदासीनतेमुळे किंवा माहितीच्या अभावामुळे लाखो पात्र मतदार यादीपासून वंचित राहतात, ही वस्तूस्थिती नाकारता येत नाही. निवडणूक आयोगाने ऑनलाईन पोर्टल असो वा बीएलओ (BLO) द्वारे प्रत्यक्ष अर्ज स्वीकारण्याची दिलेली सोय असो, सर्व प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक केली आहे. तांत्रिक विसंगती किंवा 'नो मॅपिंग'च्या नोटिसा मिळालेल्या मतदारांसाठी अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्याची दिलेली शिथिलता प्रशासनाची सकारात्मक भूमिका स्पष्ट करते. आता खरी जबाबदारी नागरिकांची आहे; "माझ्या एका मताने काय फरक पडणार?" ही मानसिकता बाजूला सारून प्रत्येक पात्र नागरिकाने १२ ऑक्टोबरची वाट न पाहता १० आणि ११ ऑक्टोबरच्या विशेष शिबिरांत सहभाग घेतला पाहिजे. मजबूत लोकशाहीची पायाभरणी ही परिपूर्ण आणि अचूक मतदार यादीतूनच होते, हे भान सर्वांनी राखायला हवे.

निवडणूक प्रक्रिया जबाबदारी व दक्षतेने पार पाडावी : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

15 मतदान केंद्राध्यक्ष, 24 मतदान अधिकारी आणि 14 क्षेत्रीय अधिकारी गैरहजर; कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यात नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी-कर्मचारी तसेच क्षेत्रीय अधिकारी यांचे पहिले प्रशिक्षण आज, शुक्रवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील सभागृहात संपन्न झाले.

यावेळी जिल्हाधिकारी तथा ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी निवडणूक प्रक्रियेतील विविध बारकाव्यांबाबत मार्गदर्शन केले. निवडणुकीदरम्यान प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी, निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे आणि मतदान प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षणादरम्यान उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांनी मतदान प्रक्रियेविषयी तांत्रिक मार्गदर्शन केले. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या, मतदान केंद्रावरील व्यवस्थापन, निवडणूकविषयक कागदपत्रांची हाताळणी, मतदान प्रक्रियेतील नियम व सूचनांचे पालन तसेच निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज करण्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

सदर निवडणुकीसाठी परभणी जिल्ह्यात एकूण २६ क्षेत्रीय अधिकारी, १०० मतदान केंद्राध्यक्ष आणि ३०० मतदान अधिकारी-कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. या प्रशिक्षणादरम्यान १४ क्षेत्रीय अधिकारी, १५ मतदान केंद्राध्यक्ष आणि २४ मतदान अधिकारी (१, २ व ३) गैरहजर असल्याचे निदर्शनास आले. प्रशिक्षणास अनुपस्थित राहिलेल्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असून, त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या खुलाशांची छाननी करून नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणास उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांच्यासह तहसीलदार परभणी संदीप राजापुरे, तहसीलदार पूर्णा माधवराव बोथीकर, तहसीलदार गंगाखेड उषाकिरण श्रृंगारे, तहसीलदार जिंतूर शितल कछवे, तहसीलदार सेलू शिवाजी मगर, तहसीलदार सोनपेठ सुनील कावरखे तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आगामी पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक तांत्रिक माहिती व निवडणूकविषयक मार्गदर्शन देण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. निवडणुकीचे कामकाज विहित नियमांनुसार आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधितांनी सक्रिय सहभाग घेऊन आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

वनामकृविच्या सामुदायिक विज्ञान महाविद्यालयात नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी 'ओरिएंटेशन कार्यक्रम'

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सामुदायिक विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी 'ओरिएंटेशन कार्यक्रम' उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. नवप्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शैक्षणिक वातावरणाशी परिचित करून देणे, अभ्यासक्रम, शैक्षणिक नियम, परीक्षा पद्धती, उपलब्ध सुविधा तसेच विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती करून देणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड होत्या. मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात शिस्त, वेळेचे नियोजन आणि नियमित अभ्यास यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही अनुचित प्रकाराला बळी पडू नये तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांशी मानसन्मानाने व आदराने वागावे, असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयीन जीवन हे व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाचे असून शैक्षणिक प्रगतीसोबतच चांगले संस्कार, सकारात्मक दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी जोपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी सामुदायिक विस्तार व संदेशवहन व्यवस्थापन विभागाचे विषय प्रमुख तथा शिक्षण प्रभारी डॉ. शंकर पुरी यांनी



विद्यार्थ्यांना शैक्षणिक नियम, परीक्षा पद्धती व विद्यापीठाच्या विविध विनियमांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची रचना, शैक्षणिक जबाबदाऱ्या, उपस्थिती, परीक्षा प्रक्रिया, अंतर्गत मूल्यमापन तसेच विद्यापीठामार्फत उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक संधींची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातील प्रत्येक संधीचा सकारात्मक उपयोग करून आपले ज्ञान, कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकसित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

२०२६ बॅचचे पाल्य प्राध्यापक डॉ. सुनीलदत्त जक्कावाड यांनी नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करून महाविद्यालयीन जीवनातील अडचणी, शैक्षणिक प्रश्न किंवा अन्य बाबींबाबत विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे संबंधित शिक्षकांशी संपर्क साधावा, असे आवाहन केले. महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सदैव सहकार्य करण्यास तत्पर असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान सहाय्यक पाल्यप्राध्यापक प्रा. आदिनाथ बेले तसेच महाविद्यालयातील विविध विभागांच्या प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या विभागाची कार्यपद्धती, जबाबदाऱ्या, उपलब्ध सुविधा आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सेवांची माहिती करून दिली. यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध विभागांची कार्यप्रणाली तसेच भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक संधींबाबत प्राथमिक माहिती मिळाली.

कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी सहाय्यक पाल्यप्राध्यापक डॉ. कल्पना लहाडे यांनी सांभाळली. त्यांनी कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय प्रभावीपणे केला.

सामुदायिक विज्ञान हे बहुआयामी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे क्षेत्र असून, बदलत्या काळातील कौशल्यांच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य, सर्जनशीलता, नेतृत्वगुण आणि उद्योजकतेचा विकास करावा, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

या ओरिएंटेशन कार्यक्रमामुळे नवप्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शैक्षणिक वातावरण, अभ्यासक्रम, नियम व विनियम, उपलब्ध सुविधा, विभागांची कार्यपद्धती तसेच विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती मिळाली. नव्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयीन जीवनातील पहिला टप्पा आनंददायी, आत्मविश्वासपूर्ण आणि सकारात्मक वातावरणात सुरू व्हावा, या भावनेतून त्यांचे सामुदायिक विज्ञान महाविद्यालय परिवारात मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. तुमचा शैक्षणिक प्रवास येथून सुरू होतो; ज्ञान, शिस्त आणि कौशल्यांच्या बळावर उज्ज्वल भविष्य घडवा, या प्रेरणादायी संदेशाने नवप्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

सेवा संकल्प अभियान; पाथरी येथील वसतिगृहातील मुलींची आरोग्य तपासणी



हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पाथरी येथील शासकीय मुलींच्या वसतिगृहाची तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आर. पुजारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती गायकवाड आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या पथकाने भेट देऊन पाहणी केली. यावेळी वसतिगृहातील मुलींच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली.

या भेटीदरम्यान वसतिगृहातील स्वयंपाकगृह, धान्य साठवण कक्ष, मुलींची स्वच्छतागृहे तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यांची पाहणी करण्यात आली. वसतिगृहातील स्वच्छता आणि उपलब्ध सुविधांची पाहणी करून अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम पथकाच्या वतीने वसतिगृहातील मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच मुलींच्या हिमोग्लोबिनचे प्रमाण तपासण्यासाठी हिमोग्लोबिन चाचणीही करण्यात आली. मुलींच्या आरोग्याची नियमित तपासणी, पोषणस्थितीचे निरीक्षण आणि आरोग्यविषयक काळजी घेण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

याशिवाय, पाथरी बाल विकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यासाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमातून मुलींचे आरोग्य तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या आरोग्याची काळजी घेण्यावर भर देण्यात येत आहे.

वेदना सहन करण्याची गरज नाही; पॅलिएटिव्ह केअरमधून मिळतो आधार; जागतिक हॉस्पिस व पॅलिएटिव्ह केअर दिनानिमित्त जनजागृती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : गंभीर व दीर्घकालीन आजारांनी त्रस्त रुग्णांना वेदनामुक्त जीवन जगता यावे, तसेच त्यांना शारीरिक त्रासासोबतच मानसिक व भावनिक आधार मिळावा, यासाठी पॅलिएटिव्ह केअर सेवा महत्त्वाची आहे. जागतिक हॉस्पिस व पॅलिएटिव्ह केअर दिनानिमित्त जिल्ह्यात या सेवांचे महत्त्व, वेदना व्यवस्थापन आणि गृहआधारित आरोग्यसेवांबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

दरवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी हा दिवस साजरा केला जातो. यंदा १० ऑक्टोबर रोजी हा दिवस साजरा होत असून, 'वेदना व्यवस्थापन : पॅलिएटिव्ह केअरचा अत्यावश्यक भाग' ही संकल्पना मांडण्यात आली आहे.

वेदना व्यवस्थापनाला प्राधान्य

कर्करोग, दीर्घकालीन आजार आणि गंभीर स्वरूपाच्या इतर आजारांमुळे रुग्णांना वेदना, अशक्तपणा, झोपेचा त्रास, श्वास घेण्यास अडचण आणि भूक मंदावणे अशा समस्यांना सामोरे जावे लागते. अशा वेळी वेळेवर वैद्यकीय सल्ला, योग्य उपचार आणि वेदनांचे व्यवस्थापन मिळणे आवश्यक आहे. पॅलिएटिव्ह केअरमध्ये रुग्णाच्या शारीरिक



त्रासासोबतच मानसिक, भावनिक व सामाजिक गरजांचाही विचार केला जातो. त्यामुळे रुग्णाचे जीवनमान सुधारण्यास मदत होते.

गृहभेटीतूनही उपचार व मार्गदर्शन

राष्ट्रीय पॅलिएटिव्ह केअर कार्यक्रमांतर्गत गरजू रुग्णांना आरोग्य संस्थांमार्फत आवश्यक सेवा, उपचार आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. घरातूनच काळजी घेणे आवश्यक असलेल्या रुग्णांना आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गृहभेटीद्वारे आरोग्य तपासणी, वेदना व्यवस्थापन, आरोग्यविषयक मार्गदर्शन आणि कुटुंबीयांना आवश्यक माहिती दिली जाते. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व इतर आरोग्य संस्थांमार्फत या सेवांबाबत जनजागृती केली जात आहे.

शेवटच्या टप्प्यातील रुग्णांपुरती सेवा मर्यादित नाही

पॅलिएटिव्ह केअर म्हणजे केवळ आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यातील रुग्णांची काळजी नव्हे, तर गंभीर किंवा दीर्घकालीन आजारांमुळे जीवनमानावर परिणाम झालेल्या रुग्णांनाही या सेवेचा लाभ घेता येतो. रुग्णांच्या कुटुंबीयांना समुपदेशन आणि भावनिक आधार देणेही या सेवेचा महत्त्वाचा भाग आहे.

जागतिक दिनानिमित्त आरोग्य अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित संस्थांच्या सहभागातून वेदना व्यवस्थापन, रुग्णांची सर्वंकष काळजी आणि उपलब्ध आरोग्य सुविधांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. रुग्णांनी वेदना किंवा अन्य त्रासदायक लक्षणांकडे दुर्लक्ष न करता जवळच्या आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

गांधी विचारांचा जागर पुढेही सुरु राहणार; मान्यवरांचा निर्धार

तुषार गांधी यांचे वर्तमानातील वास्तव निर्भीडपणे मांडण्याचे साहित्यिकांना आवाहन; 25 देशांतील प्रतिनिधींचा सहभाग



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी यांचे विचार केवळ तत्त्वज्ञानापुरते मर्यादित न ठेवता ते नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासह प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणण्याचा निर्धार व्यक्त करत दुसऱ्या अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलनाची सांगता झाली. महात्मा गांधी मिशन आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. कुमार सप्तर्षी साहित्यनगरी, एमजीएम स्पोर्ट्स स्टेडियम येथे आयोजित या संमेलनात २५ देशांतील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. दोन दिवस चाललेल्या संमेलनात गांधी विचार, साहित्य, शांतता, लोकशाही आणि तरुणाईच्या भूमिकेवर विचारमंथन झाले.

समारोपप्रसंगी महात्मा गांधी फाउंडेशनचे अध्यक्ष तुषार गांधी, गांधीवादी विचारवंत प्रा. डॉ. एम. पी. मथाई, संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. विवेक सावंत, स्वागताध्यक्ष अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, गांधीग्राम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. एन. पंचनाथम, माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे सचिव अन्वर राजन यांच्यासह देश-विदेशांतील मान्यवर उपस्थित होते.

वर्तमानातील वास्तव साहित्यिकांनी निर्भीडपणे मांडावे : तुषार गांधी

तुषार गांधी म्हणाले, भूतकाळातील गौरवात रमण्यापेक्षा वर्तमानातील परिस्थितीवरून समाजाचे मूल्यमापन केले पाहिजे. वास्तव कितीही कटू असले तरी साहित्यिकांनी ते निर्भीडपणे लेखनातून मांडावे. साहित्य हे वर्तमानाचे प्रतिबिंब असते. लोकशाहीवर विश्वास असेल तर तरुणाईच्या खांद्याला खांदा लावून उभे राहून तिच्यातील ऊर्जेला योग्य दिशा देणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

गांधी विचार आजही आचरणात आणणे शक्य : प्रा. डॉ. मथाई

प्रा. डॉ. एम. पी. मथाई यांनी गांधीजींचे विचार आजच्या काळातही प्रत्यक्ष जीवनात जगता येऊ शकतात, असे स्पष्ट केले. आजची तरुणाई गांधी विचारांची व्यवहार्यता तपासत असून त्यांच्या प्रश्नांना सकारात्मक उत्तरे देण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

गांधी विचारांसाठी लोक एकत्र येणे महत्त्वाचे : प्रा. डॉ. विवेक सावंत

संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. विवेक सावंत यांनी या संमेलनाच्या माध्यमातून गांधीजींचे विचार जिवंत ठेवण्यासाठी मोठ्या संख्येने लोक एकत्र येऊ शकतात, हे सिद्ध झाल्याचे सांगितले. संमेलनाची सुरुवात करणारे ज्येष्ठ विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांची त्यांनी आठवण काढली.

गांधी विचारांचा जागर पुढेही सुरू राहील : अंकुशराव कदम

स्वागताध्यक्ष अंकुशराव कदम यांनी देश-विदेशांतून आलेल्या प्रतिनिधींचे आभार मानले. गांधी विचारांच्या सहवासातील दोन दिवस सर्वांच्या सहभागामुळे यशस्वी झाले असून हे संमेलन पूर्णविराम नसून गांधी विचारांचा जागर पुढेही सुरू राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

श्रीलंकेसाठीही गांधी विचार उपयुक्त : डॉ. रियास सुलेमा लेब्बे

श्रीलंकेचे प्रा. डॉ. रियास सुलेमा लेब्बे यांनी गांधीजींची विचारसरणी श्रीलंकेसाठीही उपयुक्त असल्याचे सांगितले. महात्मा गांधी यांच्यावरील त्यांचे संशोधन एमजीएम विद्यापीठाने प्रकाशित केल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. श्रीलंकेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताने दिलेल्या योगदानाचाही त्यांनी उल्लेख केला.

हव्यासावर मात करण्यासाठी गांधी विचार आवश्यक : कमांडर भूषण देवाण

समाजातील वाढती लालसा आणि हव्यास अनेक समस्यांचे मूळ असल्याचे कमांडर भूषण देवाण म्हणाले. प्रगती साधताना हव्यास टाळून गांधीजींचे विचार जीवनात आचरणात आणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

बिभूती कुमार मिश्रा यांनी संमेलनाचे वर्णन दिव्य आणि अद्भुत असे करत या उपक्रमातून खूप काही शिकायला मिळाल्याचे सांगितले. जेना एडवर्ड्स यांनी गांधीजींचे विचार आजही जगभरातील लोकांना शांतता आणि सहअस्तित्वासाठी प्रेरणा देत असल्याचे नमूद केले.

तरुणाईच्या सहभागातून गांधी विचारांना जागतिक व्यासपीठ : अन्वर राजन

महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे सचिव अन्वर राजन यांनी दोन दिवसांत विविध विषयांवर सखोल चर्चा झाल्याचे सांगितले. पहिल्या संमेलनाच्या तुलनेत यंदाच्या चर्चेला जागतिक स्तरावर व्यापक स्वरूप मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. 'जेन झी'च्या आंदोलनातून तरुण पिढी गांधीजींच्या मार्गावर जबाबदारीने पुढे जात असल्याचे आशादायी चित्र दिसत असल्याचे ते म्हणाले.

२५० संशोधन निबंध; विद्यार्थ्यांच्या ३०० चित्रांतून गांधी विचारांचे दर्शन

माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे यांनी संमेलनात २५० पेक्षा अधिक संशोधन निबंध सादर झाल्याची माहिती दिली. शालेय विद्यार्थ्यांनी काढलेल्या ३०० चित्रांतून गांधी विचारांचे दर्शन घडले. मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी भाषांतील तज्ज्ञांनी विचार मांडले असून तरुण पिढीपर्यंत गांधी विचार पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

समारोप समारंभात 'रिइमॅजिनिंग गांधी थ्रू लिटरेचर', 'गांधीयन कन्स्ट्रक्टिव्ह प्रोग्राम अँड इन्स्टिट्यूशन बिल्डिंग', 'ऑल आर नॉट बॉर्न लीडर्स' आणि 'गांधीज वर्ल्ड व्ह्यू' या चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. विविध स्पर्धांतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. प्रा. डॉ. रिहाना सय्यद यांनी सूत्रसंचालन केले, तर अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने संमेलनाची सांगता झाली.

जिल्ह्यात 5,666 जन्मांची नोंद; 82 टक्के नोंदी वेळेत; 21 दिवसांत जन्मनोंदणी करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ : सेवा संकल्प अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबरदरम्यान जिल्ह्यात ५ हजार ६६६ जन्मांची नोंद झाली. त्यापैकी ४ हजार ६४७ जन्मांची नोंद २१ दिवसांच्या आत झाली असून, हे प्रमाण ८२.०२ टक्के आहे. पालकांनी बाळाच्या जन्मानंतर २१ दिवसांच्या आत नोंदणी करून जन्म प्रमाणपत्र घ्यावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक डॉ. अभय धानोरकर यांनी केले.

या कालावधीत ग्रामीण भागात १ हजार २२२, तर शहरी भागात ४ हजार ४४४ जन्मांची नोंद झाली. जन्म-मृत्यू नोंदणी कायद्यानुसार प्रत्येक जन्माची नोंद करणे आवश्यक आहे. मात्र, नोंदणीस विलंब झाल्यास पुढील काळात आवश्यक कागदपत्रे मिळवताना अडचणी येऊ शकतात. शाळेतील प्रवेश, शासकीय योजनांचा लाभ, ओळखपत्र आणि पासपोर्टसाठी जन्म प्रमाणपत्र महत्त्वाचे असते. त्यामुळे पालकांनी जन्मानंतर संबंधित ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका किंवा जन्म-मृत्यू नोंदणी केंद्रात संपर्क साधून नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. जन्मनोंदणी वेळेत व्हावी, यासाठी नोंदणी अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. तसेच एक वर्षापेक्षा अधिक विलंबाने होणाऱ्या जन्मनोंदणीची प्रकरणे कमी करण्यावर भर दिला जात आहे. दरम्यान, अभियानांतर्गत जिल्हास्तरावर 'अँड ओल्ड टॅब'द्वारे प्राप्त झालेल्या जुन्या नोंदींचा निपटारा सांख्यिकी अन्वेषक सानिया सय्यद आणि सांख्यिकी पर्यवेक्षक राजेंद्र लांघी यांनी पूर्ण केला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

सोयगाव शहरांमध्ये केंद्र सरकारच्या योजनेची पथनाट्य द्वारे जनजागृती सादर



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.९ ऑक्टोबर - देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नमो सेवा गाथा संकल्प अभियान विकसित भारत २०४७ निमित्त सोयगाव शहरांमध्ये केंद्र सरकारच्या योजनेची जनजागृती करण्यासाठी पथनाट्य सादर करण्यात आले.

केंद्र शासनाच्या योजना तळागळापर्यंत पोहोचवण्यासाठी भारतीय जनता पक्षातर्फे पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे विशेष अभियान सुरू करण्यात आले आहे या अभियानाची सुरुवात छत्रपती संभाजीनगर जिल्हा पूर्व सोयगाव शहरांमध्ये करण्यात आली.

यावेळी जिल्हा संयोजक सांडू अण्णा जाधव,सुनील गावंडे, कैलास काळे,सोयगाव पश्चिम मंडळाध्यक्ष सुनील जाधव,शहराध्यक्ष मंगेश सोहनी,युवा मोर्चा शहराध्यक्ष मयूर मनगटे,संजय मोरे,सुनील ठोंबरे,प्रसाद पठाडे,शुभम आगे, अजय पाटील,गावातील नागरिक उपस्थित होते.

इनरव्हील क्लब ऑफ लोटसचा माई वृद्धाश्रमास मदतीचा हात



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी : सामाजिक बांधिलकी जपत इनरव्हील क्लब ऑफ लोटस, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने शिवाजीनगर येथील माई वृद्धाश्रमास विविध गृहपयोगी साहित्य भेट देण्यात आले. यामध्ये स्टीलची पाण्याची टाकी, मिक्सर ग्राइंडर, पातेली, टोपले, स्टीलची परात, ग्लास, मसाल्याचा डबा, पोळपाट-लाटणे, जेवणाच्या प्लेटी आदी साहित्याचा समावेश आहे. या उपक्रमात क्लबच्या अध्यक्षा मोनाली लकडे, लता जी. केला, स्वाती मोरे, वैशाली साडगुले, सारिका अग्रवाल व इतर सदस्य सहभागी झाले. यावेळी वृद्धाश्रमाच्या संचालिका मीरा वाघमारे यांनी क्लबच्या सदस्यांचा शाल व पुस्तक देऊन सत्कार केला. कार्यक्रमाला ऋत्विक वाघमारे, प्रेरणा आझादे आणि गौरव वाघमारे उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांना आधार, प्रेम आणि सन्मान मिळावा, या भावनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वाने जेडब्ल्यूआरच्या कामगारांना तीन हजार पगारवाढ!



उरण दि ९(विठ्ठल ममताबादे)कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणारे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या दमदार आणि डॅशिंग नेतृत्वामुळेच जेडब्ल्यूआरच्या कंत्राटी कामगारांना तीन हजार रुपयांची पगारवाढ झाली आहे. त्याचा फायदा सुमारे ६० कामगारांना झाला आहे. हे कामगार स्थानिक भूमिपुत्र आहेत. कोरोना काळात ज्यांच्या हाताला काम नव्हते, कामासाठी धडपडत होते, तेव्हा महेंद्रशेठ घरत यांनी हजारोंना नोकऱ्या, त्यातीलच हे ६० कामगार आहेत. त्यामुळे कामगारांना सतत पगारवाढ आणि ऐन संकटाच्यावेळी नोकऱ्या मिळवून दिल्या आणि वाचवल्याबद्दल शुक्रवारी(ता. ९) 'सुखकर्ता' बंगल्यावर कामगारांनी महेंद्रशेठ घरत यांचे आभार मानले. यावेळी भरत गायकवाड, किरण कुंभार आदी कामगार प्रतिनिधीही उपस्थित होते.

आचार्य विनम्रसागरजींच्या मुखातून भक्तामर स्तोत्रातील 48 काव्यांचे वाचन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : विश्व भक्तामर दिनानिमित्त शुक्रवारी (९ ऑक्टोबर) छत्रपती संभाजीनगरात आचार्य श्री १०८ विनम्रसागरजी महामुनिराज यांच्या ससंघ सान्निध्यात भव्य धार्मिक सोहळा पार पडला. सकाळी ८.३० वाजता झालेल्या या कार्यक्रमात हजारो जैन समाजबांधवांनी सहभाग घेतला. सोहळ्यात आचार्य विनम्रसागरजी महाराज यांनी भक्तामर स्तोत्रातील सर्व ४८ काव्यांचे भावपूर्ण वाचन केले. प्रत्येक काव्यातील आध्यात्मिक महत्त्व आणि जीवनप्रेरक संदेश उलगडून सांगितल्याने उपस्थित भाविकांना भक्तीमय वातावरणात स्तोत्राचा भावार्थ जाणून घेण्याची संधी मिळाली. श्री नमोकार भक्ती मंडळाच्या वतीने भक्तिमय भजन सादर करण्यात आले, तर भक्तामर हीलर्स ग्रुपने स्तोत्रावर आधारित नृत्य-नाटिका सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली रावका यांनी केले. या वेळी अनीता देवी, दिलीप छाबडा व शुभम छाबडा परिवाराला पादप्रक्षालन आणि शास्त्रभेटीचा लाभ मिळाला.

गिरिजादेवी संस्थानतर्फे नवरात्रोत्सवाचे आयोजन; म्हैसमाळ येथे 11 ते 20 ऑक्टोबरदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



खुलताबाद दि ९(प्रतिनिधी): मराठवाडयाची कुलस्वामिनी भक्तांच्या नवसाला पावणाऱ्या म्हैसमाळ येथील श्री गिरिजादेवी संस्थानच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती मंदिराचे अध्यक्ष तथा तहसीलदार संतोष गुट्टे यांनी दिली.

नवरात्रोत्सवाची सुरुवात ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता घटस्थापनेने होणार आहे. नऊ दिवसांच्या उत्सवात दररोज सकाळी व सायंकाळी श्री गिरिजामातेची विशेष पूजा, आरती, शंख-चौघडा वादन तसेच सप्तशती पाठ आदी धार्मिक विधी पार पडणार आहेत.

१८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता होमहवन होणार असून, २० ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता महाभिषेक व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता पारंपरिक पद्धतीने शमीपूजन व सीमोल्लंघनाचा (दसरा) सोहळा पार पडणार आहे. तसेच २५ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता पूर्णाहुती, भजन आणि कोजागिरी पौर्णिमा उत्सवाने धार्मिक कार्यक्रमांची सांगता होणार आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त म्हैसमाळ येथे येणाऱ्या भाविकांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील तसेच दूरवरून येणाऱ्या भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री गिरिजादेवी संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

या आयोजनासाठी संस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार संतोष गुट्टे, विश्वस्त मनोहर भारती, नंद भारती, राजू भारती, मंडळ अधिकारी विजय चव्हाण, ग्राम महसूल अधिकारी नितीन गायकवाड, व्यवस्थापक ज्ञानेश्वर जाधव तसेच लिपिक विठ्ठल भारती आदी परिश्रम घेत आहेत.

संगीताच्या सुरांत शिवछत्रपतीचा डंका! राष्ट्रीय युवा महोत्सवात कु. कोमल बोर्डेची बाजी; पाश्चात्त्य वाद्य वादनात पटकावले तृतीय पारितोषिक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर

येथील शिवछत्रपती महाविद्यालयाच्या संगीत विभागाने राष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या महाविद्यालयाची गुणी विद्यार्थिनी कोमल आनंद बोर्डे हिने केंद्रीय युवा महोत्सव २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत पाश्चात्त्य वाद्य वादन (सोलो) स्पर्धेत तृतीय पारितोषिक पटकावले आहे. तिच्या या घवघवीत यशाने मराठवाड्याच्या मानचिन्हात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून शैक्षणिक आणि सांस्कृतिक वर्तुळातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

केंद्रीय युवा महोत्सवासारख्या अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि स्पर्धात्मक व्यासपीठावर कोमल बोर्डे हिने आपल्या अंगभूत कलागुणांचे आणि वादनातील कौशल्याचे अप्रतिम दर्शन घडवले. देश पातळीवरील या स्पर्धेत तिने सादर केलेले पाश्चात्त्य वाद्य वादन उपस्थितांची मने जिंकणारे ठरले. कठीण प्रसंगी संयम ठेवून तिने सादर केलेल्या वादनाने परीक्षण करणाऱ्या तज्ज्ञांचेही लक्ष वेधले आणि अखेर तिला तृतीय क्रमांकाच्या मानाच्या पारितोषिकाने गौरवण्यात आले. या उल्लेखनीय यशामागे तिची वर्षानुवर्षे असलेली संगीत साधना आणि सातत्यपूर्ण सराव फळाला आल्याचे दिसून येत आहे.

कोमल बोर्डे हिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एस. पाटील, उपप्राचार्य डॉ. संगीता राजमाने, उपप्राचार्य प्रा. भरत वहाटूळे, पर्यवेक्षक डॉ. आश्रुबा गवळी, पर्यवेक्षक राहुल पाटील आणि डॉ. जी. एन. वळेकर यांनी तिचे विशेष कौतुक करून हार्दिक अभिनंदन केले आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय नेहमीच कटिबद्ध असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले. या यशाच्या प्रवासात संगीत विभागातील प्रा. गोपालकृष्ण खोमणे, प्रा. बकुल महाजन आणि प्रा. सुनील बनकर यांचे मार्गदर्शन लाभले

स्थलांतरित मुलांसाठी 'पालावरची शाळा'; 50 विद्यार्थ्यांना शिक्षणासह भोजन

स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या पुढाकारातून बीड बायपास परिसरात उपक्रम सुरु

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : सततच्या स्थलांतरामुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या पुढाकारातून बीड बायपास परिसरात 'पालावरची शाळा' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. निशांत पार्कसमोरील मोकळ्या जागेत वास्तव्यास असलेल्या स्थलांतरित कुटुंबांतील सुमारे ५० मुले या शाळेत नियमित शिक्षण घेत आहेत. या मुलांना शिक्षणासोबतच दररोज एक वेळचे भोजनही दिले जात आहे.

आर्थिक परिस्थिती, सामाजिक अडचणी आणि रोजगाराच्या शोधात कुटुंबांचे वारंवार होणारे स्थलांतर यामुळे अनेक मुलांचे शिक्षण अर्धवट राहते. ही समस्या लक्षात घेऊन मुलांच्या वास्तव्यास असलेल्या ठिकाणीच शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला आहे. मुलांना शिक्षणाची गोडी लागावी, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होता यावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या पोषणाची गरज लक्षात घेऊन दररोज एक वेळच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. शिक्षणासोबत मुलांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यावरही भर दिला जात आहे.

या उपक्रमासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भटके विमुक्त विकास परिषद (महाराष्ट्र) यांच्या सेवा पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले आहे. विविध सामाजिक घटकांच्या सहभागातून वंचित मुलांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी प्रभागातील नगरसेवक पदमसिंह राजपूत, प्रचारक दुर्गादाची व्यास, प्रचारक राजेश मेहता, डॉ. दिवाकर कुलकर्णी, अविनाश देशमुख, सर्जेराव वाघ, स्वप्नील शिरसाठ, प्रेम खडकीकर आणि सौ. सरिता डे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

प्लास्टिकमुक्तसाठी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे!; हर्सूलच्या मनपा शाळेतील विद्यार्थ्यांची घनकचरा प्रक्रिया केंद्राला भेट

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर

प्लास्टिकचा वाढता वापर रोखण्यासाठी आणि कचरा व्यवस्थापनाची सवय विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी महानगरपालिकेच्या हर्सूल गावातील प्राथमिक शाळेत जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना हर्सूल येथील घनकचरा प्रक्रिया केंद्राची भेट घडवून आणून ओला-सुका कचरा वर्गीकरण आणि प्लास्टिकच्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार हा उपक्रम घेण्यात आला. शाळेत प्लास्टिकचा वापर टाळावा, घरासह परिसरातील नागरिकांनाही प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी प्रोत्साहित करावे, तसेच घरातील कचरा ओला आणि सुका असा वेगवेगळा करून घंटागाडीत द्यावा, असे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. स्वच्छता निरीक्षक रेणुका गायकवाड यांनी शाळेत, तर घनकचरा प्रक्रिया केंद्रात सुरजितसिंग राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शाळेपुरती जनजागृती न ठेवता ती घराघरांत पोहोचविण्याचा मनपाचा प्रयत्न आहे. याच उपक्रमांतर्गत नारेगाव आणि कांचनवाडी येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रांनाही इतर शाळांतील विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित करण्यात येणार आहेत.

यावेळी उपआयुक्त अंकुश पांढरे, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, मुख्याध्यापक जगन्नाथ सपकाळ, हर्सूल केंद्राचे घनकचरा व्यवस्थापक तनवीर खान, सुहास भाले, शिवा नेटके, भीमा हिवराळे, समुपदेशक मनिषा सुरडकर, शिक्षक संजय मोकळे, सुमन कुऱ्हाडे आणि सेवक अमोल भाले उपस्थित होते.



जिंतूर - पतंजली योग समिती योग वर्गाच्या वतीने साईसृष्टी गार्डन येथे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्या वेळी योग मार्गदर्शक प्रा. धोंडीराम शेप, योग शिक्षक सचिन रायपत्रीवार योगसाधक उपस्थित होते. छाया - सचिन रायपत्रीवार

खुलताबाद बसस्थानकातील वाहतूक नियंत्रण कक्षाचे कुलूप उघडले



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी - खुलताबाद येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एस टी बसस्थानकातील वाहतूक नियंत्रण कक्ष शुक्रवारी रोजी सकाळी वाहतूक नियंत्रण कक्षाचे कुलूप उघडण्यात आले. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना या ठिकाणाहून आज सवलतीच्या दरातील पासही देण्यात आल्या . बसस्थानकातील समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात बातमीला यश आले आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत प्रवाशांना भेडसावणाऱ्या अडचणी मांडण्यात आल्या होत्या. बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर झालेल्या या कार्यवाहीमुळे प्रसारमाध्यमांच्या पाठपुराव्याचा प्रभाव दिसून आला आहे. मात्र, केवळ कुलूप उघडणे पुरेसे नसून वाहतूक नियंत्रण कक्ष नियमित सुरू राहणे आवश्यक आहे. प्रवाशांना वेळेवर आणि सुरळीत बससेवा मिळावी, अशी अपेक्षा खुलताबाद पंचायत समितीच्या सभापती मंदाबाई बद्री वाकळे पाटील. भारतीय जनता पार्टी खुलताबाद नगरपरिषदेचे खुलताबाद नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ पाटील माजी तालुका उपाध्यक्ष संतोष करपे पाटील . कामगार नेते नारायण बांबर्डे राजेराय टाकळी येथील सामाजिक कार्यकर्ते . संजय जाधव व खुलताबाद येथील सोमवंशी यांच्यासह तालुक्यातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

सेवा संकल्प अभियानातून करमाड ग्रामीण रुग्णालयात नेत्रतपासणी; मोफत चष्मेवाटप



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - विद्यार्थ्यांच्या डोळ्यांचे आरोग्य जपण्यासाठी आणि दृष्टीदोष वेळेत ओळखून त्यावर उपचार करण्यासाठी सेवा संकल्प अभियानांतर्गत जागतिक दृष्टी दिनानिमित्त करमाड ग्रामीण रुग्णालयात विशेष नेत्रतपासणी उपक्रम राबविण्यात आला. यावेळी दृष्टीदोष आढळलेल्या गरजू विद्यार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. डोंगळीकर यांच्या सहकार्याने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या (आरबीएसके) लाडसावंगी पथकाने या उपक्रमाचे आयोजन केले. यापूर्वी आरोग्य तपासणीदरम्यान पुढील उपचारांसाठी संदर्भित करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करण्यात आली. गरजेनुसार उपचार, संदर्भ सेवा आणि आरोग्यविषयक मार्गदर्शनही देण्यात आले. या उपक्रमात बालरोगतज्ज्ञ डॉ. पठाडे, दंतचिकित्सक डॉ. दहीवाळ आणि नेत्रचिकित्सा अधिकारी तुषार भालेराव यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. तसेच आरबीएसके पथकातील डॉ. शरद राठोड, डॉ. मयुरा गोस्वामी, औषधनिर्माण अधिकारी प्रवीण मुंढे आणि आरोग्यसेविका सुनीता गाडेकर यांनी सहभाग नोंदविला.



मंगलाबाई चौधरी यांचे निधन

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.९ ऑक्टोबर - येथील मंगलाबाई दत्तू चौधरी (वय.६५)यांचे दि.८ गुरुवार रोजी ७ वाजता निधन झाले.त्यांच्यावर शुक्रवार रोजी सकाळी १० . ३० वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती,एक मुलगा,दोन मुली,सून,नातवंडे असा परिवार होत.पत्रकार दिलीप चौधरी यांच्या वहीणी तर विजय चौधरी यांच्या काकू होत.

दुष्काळ जाहीर; शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शेख सलीम मैदानात!

बांधावर जाऊन पिकांची पाहणी; नुकसानग्रस्त बळीराजाला तातडीने मदत देण्याची प्रशासनाकडे मागणी

अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यात दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शिवना परिसरातील शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. पावसाने ओढ दिल्याने करपून गेलेली पिके, शेतीचे झालेले नुकसान, पाणीटंचाई तसेच जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न याची त्यांनी पाहणी करून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.

यावेळी शेतकऱ्यांनी खरीप हंगामात झालेल्या नुकसानीची माहिती शेख सलीम यांच्यासमोर मांडली. शेतीसाठी केलेला खर्च, पावसाअभावी हातातून गेलेले उत्पादन आणि वाढलेला आर्थिक ताण यामुळे बळीराजा मोठ्या संकटात सापडल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.



दुष्काळ जाहीर झाला असला तरी शासनाची मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या हातात पोहोचणे हीच खरी गरज आहे, अशी भूमिका शेख सलीम यांनी मांडली. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत, पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी, पीकविम्याची रक्कम मिळवून द्यावी तसेच दुष्काळी सवलतींचा लाभ कोणताही पात्र शेतकरी वंचित राहणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

शिवना परिसरातील दुष्काळी परिस्थितीचा सविस्तर आढावा घेत ग्रामसेवक रवी गंगावणे यांच्यासह संबंधित यंत्रणेशी चर्चा करण्यात आली. पाणी व चाऱ्याच्या टंचाईवरही तातडीने उपाययोजना करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

"दुष्काळ जाहीर झाला आहे, आता शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा आहे. बळीराजाने मोठ्या कष्टाने उभे केलेले पीक डोळ्यांसमोर वाया गेले आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची परिस्थिती स्वतः पाहिली आहे. त्यांच्या प्रत्येक अडचणीचा आवाज शासन आणि प्रशासनापर्यंत पोहोचवून तातडीची मदत मिळवून देण्यासाठी माझा पाठपुरावा सुरूच राहील. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही माझी जबाबदारी आहे," असे पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी सांगितले.

जसखार ग्रामसुधारणा मंडळाच्या अध्यक्षपदी रंजीत पाटील, तर सेक्रेटरीपदी सुरज कडू

हिंदू प्रकाश वार्ता



उरण /रायगड : सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या जसखार ग्रामसुधारणा मंडळाच्या निवडणुकीत रंजीत पाटील यांची अध्यक्षपदी, तर सुरज कडू यांची सेक्रेटरीपदी निवड झाली. या निकालानंतर गावातील सामाजिक तसेच स्थानिक राजकीय समीकरणांबाबत चर्चा रंगली असून, आगामी २०२७ च्या ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या निकालाकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष रंजीत पाटील आणि सेक्रेटरी सुरज कडू यांच्या नेतृत्वाखाली ग्रामसुधारणा मंडळाच्या माध्यमातून गावातील सामाजिक, विकासात्मक आणि नागरी प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम केले जाईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे.पंचपदासाठी भारत तांडेल, मिलिंद ठाकूर, जतिन पाटील, दिवेश घरत, देवानंद घरत, लतिकेश म्हात्रे, हितेश ठाकूर, गणेश ठाकूर, हेमंत ठाकूर, ऋषिकेश म्हात्रे, हार्दिक पारवे, वैष्णव ठाकूर, हेमंत ध. ठाकूर, केतन ठाकूर यांची निवड झाली.निवडणुकीनंतर विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी जल्लोष करत त्यांचे अभिनंदन केले. ग्रामस्थांनी दिलेला विश्वास सार्थ ठरवून गावाच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

छत्रपती संभाजीनगर
शनिवार, दि. १० ऑक्टोंबर २०२६

करिअरचा ताण, सोशल मीडियामुळे न्यूनगंड; युवकांच्या मानसिक आरोग्यापुढे नवी आव्हाने

ताण मनात ठेवू नका, गरज पडल्यास समुपदेशकांची मदत घ्या; डॉ. महेश मरकड यांचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : वाढती स्पर्धा, करिअरविषयीची चिंता, सोशल मीडियावरील तुलना आणि बदलती जीवनशैली यांमुळे आजच्या युवकांमध्ये मानसिक ताणतणाव वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या युगात युवकांकडे नवनवीन संधी आणि कौशल्ये असली, तरी मानसिक आरोग्य जपणे हे त्यांच्यासमोरील महत्त्वाचे आव्हान बनले आहे. मानसिक त्रासाकडे दुर्लक्ष न करता मनातील भावना मोकळेपणाने व्यक्त कराव्यात आणि गरज भासल्यास तज्ज्ञांची मदत घ्यावी, असे आवाहन मानसतज्ज्ञ डॉ. महेश मरकड यांनी केले आहे.

शैक्षणिक स्पर्धा, कुटुंबाच्या अपेक्षा आणि भविष्याविषयीची अनिश्चितता यांमुळे युवकांवर मानसिक दबाव निर्माण होतो. अपेक्षेप्रमाणे यश न मिळणे किंवा रोजगाराच्या मर्यादित संधी यांमुळेही त्यांच्यात निराशा वाढू शकते. त्यात सोशल मीडियावरील इतरांचे यशस्वी आयुष्य पाहून स्वतःची तुलना करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. यातून न्यूनगंड, एकटेपणा आणि चिंता निर्माण होण्याची शक्यता असते.

शारीरिक आजारासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे जितके स्वाभाविक आहे, तितकेच मानसिक आरोग्यासाठी तज्ज्ञांची मदत घेणेही महत्त्वाचे आहे. मानसिक त्रासाबद्दल लाज न बाळगता योग्य वेळी मदत घेणे आवश्यक आहे. युवकांनी स्वतःच्या मानसिक आरोग्याला प्राधान्य दिल्यास ते अधिक सक्षम आणि सकारात्मक समाज घडवू शकतील.

— डॉ. महेश मरकड, चिकित्सा मानसतज्ज्ञ, जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम, जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर.

बदलत्या जीवनशैलीचाही परिणाम

अपुरी झोप, व्यायामाचा अभाव, असंतुलित आहार आणि तासन्तास भ्रमणध्वनीच्या पडद्यावर वेळ घालवण्याचा परिणाम शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक स्वास्थ्यावरही होतो. डिजिटल माध्यमांशी सतत जोडलेले असूनही प्रत्यक्ष संवाद कमी होत असल्याने अनेक युवकांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी विश्वासाची व्यक्ती मिळत नाही. त्यामुळे मनातील ताण वाढण्याची शक्यता असते.

मदत मागणे कमकुवतपणाचे लक्षण नाही

मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी युवकांनी मित्र, कुटुंबीय किंवा समुपदेशकांशी मोकळेपणाने संवाद साधावा. सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवून प्रत्यक्ष नातेसंबंधांना वेळ द्यावा. योग, ध्यान, नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप यांना दैनंदिन जीवनात महत्त्व द्यावे. तसेच वाचन, संगीत, चित्रकला आणि क्रीडा यांसारखे छंद जोपासल्याने ताण कमी करण्यास मदत होऊ शकते.

एसबीआयच्या तीन एटीएम मधून हार्ड डिस्क ची चोरी करणारे करणारे पोलिसांच्या ताब्यात

हिंदू प्रकाश वार्ता

परभणी**गेल्या अनेक दिवसापासून परभणी मध्ये कुठला ना कुठला सायबर गुन्ह्याचे प्रकार उघडकीस येण्याचे सत्र चालूच असून त्याचप्रमाणे शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियाचे तीनएटीएम मधून हार्ड डिस्क चोरी केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा व नानलपेठ पोलीस स्टेशन यांनी संयुक्त कारवाई करून तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे सदरील कार्यवाही मध्ये तीन लाख दोन हजार शंभर रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



शहरांमध्ये गजबजलेले ठिकाण व मुख्य बाजारपेठेतील भिकूलाल पेट्रोल पंपा जवळील ,क्रांती चौक, येथील व सुपर मार्केट रोडवरील महात्मा फुले कॉलनी जवळील अशाप्रकारे तीन एसबीआय एटीएम मधून हार्ड डिस्क काढून चोरी चोरी झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली सदरील गुन्ह्याची माहिती मिळतात स्थानिक गुन्हे शाखा व नाना पेठ पोलीस स्टेशन यांनी तात्काळ कार्यवाही करून दोन तासाच्या आत पुण्यातील तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

दुष्काळ निर्मूलन तात्पुरत्या मलमपट्ट्या न लावता कायमस्वरूपी उपाययोजना हव्यात

विश्वनाथ (अण्णा)तोडकर यांचे प्रतिपादन

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी

**मराठवाड्याच्या वाट्याला येणारा नियतीचा दुष्काळ हा कायमस्वरूपी हटवण्यासाठी स्वतंत्र उपाययोजना हव्यात असे प्रतिपादन महाराष्ट्र लोकविकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ अण्णा तोडकर यांनी केले.

महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांच्या कार्यशाळेची आयोजन महाराष्ट्र लोकविकास मंच या स्वयंसेवी संघटनेच्या वतीने करण्यात आले होते. या गुगल मीटमध्ये महाराष्ट्रातल्या सातारा, सांगली,पुणे,बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, परभणी, बुलढाणा,अशा विविध जिल्ह्यातून स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या होत्या.

जल हे जीवन आहे त्याचं संगोपन आणि योग्य वापर होण्यासाठी सरकारने ठोस उपाय योजना कराव्यात. कमी पाण्यात जास्त पीक घेणे आणि मराठवाडा दुष्काळ मुक्त करणे यासाठी सरकारने योग्य निर्णय घेऊन दुष्काळमुक्त मराठवाडा आणि महाराष्ट्र करावा या विषयावरती जागतिक लेवलवरचे पाणी तज्ञ विलास कुलकर्णी पुणे यांनी आपले विचार मांडले .

यानंतर कायमस्वरूपी दुष्काळ मुक्त व्हावा पाण्याचं सू नियोजन व्हावं पडणाऱ्या पाण्याचा प्रत्येक थेंब हा पाणी मुरण्यासाठी आणि जतन करण्यासाठी व्हावा छोट्या छोट्या उद्योग व्यवसाय करणाऱ्यांना पाठबळ द्यावं. शेतीची सर्व कामे रोजगार हमी योजनेला जोडली जावीत. या विषयावरती माननीय विश्वनाथ अण्णा यांनी विचार मांडले. या सर्व विचार प्रवाहामध्ये महाराष्ट्रातल्या अनेक विशेषतज्ञानी यामध्ये सहभाग नोंदवला. सरकारने तात्पुरत्या उपाययोजना न करता कायमस्वरूपी मराठवाड्यातला दुष्काळ नव्हे तर महाराष्ट्राला दुष्काळ मुक्त करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत. दुष्काळमुक्त महाराष्ट्र 2030 याची बांधणी करावी असा एकूणच सर्व स्वर स्वयंसेवी संस्थांचा निर्माण झाला होता.

या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र लोकविकास मंच, उत्तरदायित्व NGO फाउंडेशन यांच्यावतीने करण्यात आले

करपलेली पिके, आटलेल्या विहिरी; शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकण्यासाठी केंद्रीय पथक बांधावर!

रात्री नऊ ते दुसऱ्या दिवशी दुपारी चारपर्यंत पाहणी; छत्रपती संभाजीनगर, जालना, बीडमधील दुष्काळाची तीव्रता जाणली

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

पावसाने ओढ दिली, विहिरी आटल्या आणि शेतातील उभी पिके करपून गेली. वर्षभराच्या कष्टांवर पाणी फिरल्याने शेतकऱ्यांसमोर आता कर्जफेड, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न उभा ठाकला आहे. मराठवाड्यातील दुष्काळाचे हे विदारक चित्र शुक्रवारी केंद्रीय पथकाने प्रत्यक्ष शेतशिवारात अनुभवले. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करताना पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. विशेष म्हणजे, पन्हाटीच्या शेतात काम करणाऱ्या महिला शेतमजुरांशी संवाद साधण्यासाठी पथकाने आपला ताफाही थांबविला.

गुरुवारी, ८ ऑक्टोबर रोजी रात्री नऊ वाजता विभागीय आयुक्तालयात सुरू झालेला आढावा आणि त्यानंतरचा दौरा



शुक्रवारी दुपारी चार वाजेपर्यंत सुरू होता. कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तीन जिल्ह्यांतील शेतांमध्ये जाऊन पिकांची स्थिती, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या अडचणींची माहिती घेतली.

पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश होता. राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग हेही दौऱ्यात सहभागी झाले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी गुरुवारी रात्री झालेल्या बैठकीत मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे सादरीकरण केले. पर्जन्यमानातील तूट, खरीप पिकांचे नुकसान, धरणांतील पाणीसाठा, भूजल पातळी, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, चारा आणि रोजगाराच्या प्रश्नांवर यावेळी प्रकाश टाकण्यात आला. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे विभागातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी सहभागी झाले होते.

विभागातील ७६ तालुक्यांमध्ये खरीप पेरणीचे क्षेत्र सुमारे ५२ लाख हेक्टर आहे. पावसाच्या दीर्घ खंडामुळे पिकांच्या वाढीवर आणि संभाव्य उत्पादनावर गंभीर परिणाम झाला आहे. धरणांमधील पाणीसाठा ३०.७ टक्क्यांवर घसरला असून जालना, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांतील भूजल पातळी मागील पाच वर्षांच्या सरासरीपेक्षा चार ते पाच मीटरने खाली गेली आहे. विभागातील १९० गावे आणि १५७ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून ६०३ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. या आकडेवारीची प्रत्यक्ष परिस्थितीशी पडताळणी करून अहवाल शासनाला सादर करण्यात येईल, असे पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांनी स्पष्ट केले.

शिवना सज्ज! पाणीटंचाई रोखण्यासाठी गाव तलाव परिसरात विहिरीचे काम सुरू

पंचायत समिती सदस्य शेख सलीम, ग्रामपंचायत सदस्य विनायक काटकर यांचा पुढाकार

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीर

सिल्लोड तालुक्यातील शिवना गावात आगामी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, तसेच ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येऊ नये, यासाठी आतापासूनच उपाययोजनांचे प्रयत्न सुरू झाले आहेत. गाव तलाव परिसरात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विहिरीचे काम सुरू करण्यात आले असून, संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पूर्वनियोजनावर भर दिला जात आहे.

दुष्काळाचे संकट ओळखून पाण्यासाठी नियोजन!

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी उन्हाळ्यात पिण्याच्या



पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन गावात पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा संकट येण्यापूर्वीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. याच उद्देशाने गाव तलाव परिसरात विहिरीचे काम सुरू करण्यात आले आहे.

पंचायत समिती सदस्य शेख सलीम, ग्रामपंचायत सदस्य विनायक काटकर यांचा पुढाकार

गावातील नागरिकांना मुबलक पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे आणि उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये, यासाठी पंचायत समिती सदस्य शेख सलीम भाई आणि ग्रामपंचायत सदस्य विनायक काटकर विशेष प्रयत्न करीत आहेत. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सुरू असलेल्या या कामामुळे आगामी काळात पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विहिरीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचा प्रत्यक्ष पाणीपुरवठ्यासाठी कितपत उपयोग होतो, हे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे काम वेळेत पूर्ण होणे आणि पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.

पाण्याचे नियोजन आजचे, तर पाणीटंचाईमुक्त शिवना उद्याचे!

ग्रामस्थांना उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागू नये, यासाठी सुरू असलेल्या या प्रयत्नांकडे आता संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह कार्यक्रम संपन्न

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.९ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयातील करिअर गायडन्स प्लेसमेंट सेल व एलआयसी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला एलआयसी ऑफ इंडियाचे विकास अधिकारी राजेंद्र हंडाळ, अजिंक्य कालूसे व उपशाखा अधिकारी राजेश इंगोले यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.राजेंद्र हंडाळ यांनी भारतीय आयुर्विमा महामंडळामध्ये नवीन एजंट भरतीची सर्व प्रक्रिया सांगून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले.तसेच एलआयसी एजंट म्हणून आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर उच्च पदापर्यंत पोहोचता येते तसेच मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभही मिळू शकतो, असे त्यांनी सांगितले.

उपशाखा अधिकारी इंगोले यांनी भारतीय आयुर्विमा महामंडळ ही भारत सरकारची एक महत्त्वाची विमा कंपनी असून भारतातील विमा व्यवसायामध्ये एलआयसीचा मोठा वाटा असल्याचे सांगितले.संपूर्ण भारतात एलआयसी ही एक अतिशय विश्वासार्ह विमा कंपनी असल्याचे त्यांनी



नमूद केले.या कंपनीमध्ये तरुणांनी कोणतेही भांडवल न गुंतवता एजंट म्हणून सुरुवात करून एलआयसीची एजन्सी घेणे आणि आपल्या संभाषण कौशल्यातून व बुद्धीच्या जोरावर आर्थिक संपन्नता मिळवणे शक्य असल्याचे सांगत, यासंदर्भातील अनेक उदाहरणे त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.पांडुरंग डापके यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. भास्कर टेकाळे यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.विक्रम भुतेकर, डॉ.एम. आर.खान,डॉ.ज्योती अधाने, प्रा.प्रफुल देवरे,प्रा. गोविंद फड,डॉ.श्रीकांत जाधव,डॉ.राजू वनारसे,डॉ. राजू तुपे,प्रा.निखिल भिसे,राजू मोरे,भरत औरंगे व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीत भाजपचा मास्टरस्ट्रोक

दक्षिण रायगडचे युवा नेते निलेश थोरे यांच्या खांद्यावर प्रचाराची धुरा

बोरघर,माणगाव* - आगामी पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक पातळीवर महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष, युवानेते निलेश कुंडलिक थोरें यांची निवडणूक प्रचारक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, निवडणुकीचे प्रभारी ना. चंद्रकांतदादा पाटील, सहप्रभारी तथा केंद्रीय मंत्री ना. मुरलीधर मोहोळ आणि दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा माजी खासदार धैर्यशीलदादा पाटील यांच्या सूचनेनुसार करण्यात आली आहे.

उच्चशिक्षित आणि संघटन-कुशल नेतृत्व

निलेश थोरें हे B.Tech. शिक्षण घेतलेले उच्चशिक्षित युवा नेतृत्व आहे. शिक्षक आणि पदवीधर मतदारांच्या प्रश्नांची सखोल जाण, प्रभावी संवादकौशल्य आणि संघटनात्मक कामाचा प्रदीर्घ अनुभव ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

यापूर्वी कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत त्यांनी प्रचाराचे नियोजन आणि पक्षाची संघटनात्मक यंत्रणा प्रभावीपणे राबवली आहे. दक्षिण रायगड जिल्ह्यात युवा मोर्चाच्या माध्यमातून विविध सामाजिक, संघटनात्मक आणि जनसेवा उपक्रमांचे यशस्वी नियोजन करून त्यांनी तरुण कार्यकर्त्यांचे मजबूत नेटवर्क उभे केले आहे. बूथस्तरापासून वरिष्ठ पदाधिकाऱ्यांपर्यंत समन्वय साधण्याची त्यांची कार्यपद्धती पक्षासाठी नेहमीच उपयुक्त ठरली आहे.

निलेश थोरें यांची प्रतिक्रिया

या नियुक्तीबद्दल बोलताना निलेश थोरें म्हणाले, “पक्षाने माझ्यावर विश्वास ठेवून ही जबाबदारी सोपविल्याबद्दल मी सर्व वरिष्ठ नेत्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. शिक्षक आणि पदवीधरांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी, त्यांच्याशी थेट संवाद साधण्यासाठी आणि पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करेन.”

या नियुक्तीमुळे दक्षिण रायगडमधील युवा नेतृत्वाला पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळाली आहे.

तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मुलींनी मारली बाजी

सिल्लोड : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व जिल्हा क्रीडा कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमानाने कै. ॲड. आशिष पालोदकर यांच्या चतुर्थ स्मृती प्रित्यर्थ तालुकास्तरीय शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यात श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या सतरा वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

विजयी संघास पाच हजार रुपये रोख व सन्मान चिन्ह राजश्री शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर पालोदकर यांच्या हस्ते देण्यात आले तर

पारितोषिक वितरण समारंभासाठी शहर पोलीस स्टेशनचे निवृत्त पोलीस निरीक्षक शेषराव उदार, संस्थेच्या संचालिका डॉ. रूपाली पालोदकर, एसबीआय बँकेचे शाखा व्यवस्थापक सत्यानंद सिंग, मकरंद कोरडे, प्राचार्य डॉ. अशोक पंडित, विद्यालयाचे मुख्याध्यापक निशांत म्हस्के उपस्थित होते.

तालुक्यातील विविध शाळांच्या



संघांमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत सुरुवातीपासूनच श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मुलींनी आपले वर्चस्व राखले. अंतिम सामन्यात अत्यंत अटीतटीच्या आणि रोमांचक लढतीत संघातील खेळाडूंनी चपळाई, उत्कृष्ट रणनीती आणि सांघिक समन्वयाच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाला धूळ चारली.

अंतिम सामन्यात, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय संघाचा सामना ज्ञानविकास विद्यालय भराडी यांच्या संघासोबत झाला. हा सामना अत्यंत चुरशीचा आणि अटीतटीचा झाला. मात्र, विद्यालयाच्या चढाईपटूंनी अचूक गुण मिळवत आणि बचावफळीने उत्कृष्ट पकड करत प्रतिस्पर्धी संघाला बॅकफूटवर ढकलले. सामन्याच्या शेवटच्या काही मिनिटांत उत्कृष्ट रणनीती आखत मुलींनी प्रतिस्पर्धी संघावर मात केली आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले. यात संघप्रमुख नेहा दुधे,पायल मरकडे, साक्षी चाबुकस्वार, कावेरी ठाले, वेदिका गाडेकर, आदिती जाधव, गौरी घोडके, आरुषी जरारे, प्रगती पंडित, हर्षदा थोरात, रूपाली जोगदंडे, खुशी सुरडकर विद्यार्थिनींचा समावेश होता.

तालुका पातळीवर प्रथम क्रमांक पटकावल्यामुळे विजयी संघाची आता जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या घवघवीत यशामुळे खेळाडूंचा आत्मविश्वास कमालीचा वाढला असून, जिल्हा स्तरावरही अशीच कामगिरी करण्याचा निर्धार विजयी विद्यार्थिनींनी व्यक्त केला आहे. या घवघवीत यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशात क्रीडा प्रशिक्षक अंगद काळे, लक्ष्मण कोलोड, नम्रता वडमारे यांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थिनींनी घेतलेले कठोर परिश्रम अत्यंत महत्त्वाचे ठरले.

मुलींनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. राहुल पालोदकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गजानन डमाळे, विद्यालयाचे शिक्षक रमेश सोनवणे, नरेशसिंग राजपूत, सुनील तांबे, रमेश परदेशी, कडूबा गीते, गणेश चव्हाण, भास्कर सागरे, अरविंद सोनवणे, अमोल ताटू, गजानन दौड, डॉ. रमेश काळे, पंकज सावंत, संगीता तायडे, संगीता काळे, हर्षदा सनान्से, रमेश सपकाळ, शैलेश मोरे आणि व्यवस्थापन समितीने विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले असून जिल्हास्तरीय स्पर्धेतही अशाच देदीप्यमान यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911